**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.०२**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -महेश मुनेश्वर वंजारी.

**<u>प्रतिवादीतर्फे सा.क्र.२ चा सरतपास शपथेवर प्रतिवादी तर्फे वकील श्री एन.एस.इंगळे यांच्या मार्फत सुरू.</u>**

**१०.** माझे शपथपत्र नि. क्र.५२ मधील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे.

<u>मी खालील दस्तऐवज अभिलेखावर दाखल केले आहे.</u>

**i)** माझे आजोबा हरिदास गणेश वंजारी यांनी माझ्या हक्कात गट क्र.२२ आ.रा.जी.१.८६ हे.आर. शेतीच्या संदर्भात बक्षीसपत्र करून ठेवले आहे. सदर बक्षीसपत्र हे माझ्या आजोबांनी १६/१२/२०१७ मध्ये केलेले आहे. सदर बक्षीसपत्र मला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आता मला सदर बक्षीसपत्र मुळ दाखविण्यता आले. ते तेच आहे, त्यावर बक्षीसपत्र लिहून देणार म्हणून माझे आजोबा हरिदास गणेश वंजारी यांचे नाव आहे व त्यांची सही व आंगठा आहे. तसेच त्यावर त्यांचा फोटो आहे. बक्षीसपत्र लिहून घेणार म्हणन माझे वडील आहे. त्यावर बक्षीसपत्र लिहून घेणार म्हणुन माझ्या वडीलांचे नाव, फोटो, सही व आंगठ्याची निशानी आहे. तसेच त्यावर साक्षीदार म्हणून अशोक माणिकराव नाकाडे व दुसरा शैलेश भिकाजी शंभरकर यांचे सही, आंगठे व फोटो आहे. तसेच दस्तलेखक म्हणून त्यावर सरिनकुमार शंभरकर यांची सही आहे. गट न.२२ मधील शेतीवर माझा कब्जा आहे. सदर शेती ही मौजा किनाळा येथील आहे. सदर बक्षीसपत्राला यापुर्वीच आर्टीकल अ देण्यात आलेले आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>वादीतर्फे वकील श्री. बी.एस.मणे यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरू.</u>**

**११.** माझ्या वडीलांचे नाव मुनेश्वर हरिदास वंजारी असे आहे. हे म्हणणे खरे आहे

की,नि.क्र.५२ शपथपत्र हे माझ्या वडीलांनी जसे शपथपत्र दिले आहे तसेच शपथपत्र आहे. हे मला माहित नाही की, माझ्या आजोबांना जिवनदास व भगवानदास हे दोन भाऊ होते किंवा कसे. माझ्या वडीलांना दोन बहीणी होत्या, त्या सदर दाव्यामध्ये एक बहीण वादी आहे, तर एक बहीण प्रतिवादी क्र.३ आहे. भुमापन नंबर २२ मधील जमीन ही माझे आजोबा हरिदास गणेश वंजारी यांच्या स्वमालकीची होती हे दाखविण्यासाठी मी अभिलेखावर पुरावा दाखल केलेला नाही. हे मला माहित नाही की, सदर भुमापन नंबर २२ चा पुर्वी जुना भुमापन नंबर हा २४ होता किंवा कसे. हे मला माहित नाही की, सदर भुमापन नं.२४ चे तीन गट पडले होते किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, भुमापन नं.२२ ही जमीन माझे आजोबा व माझे वडील वाहत होते. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, माझे वडील ड्युटीवर होते त्यामुळे माझे आजोबा शेती वाहत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे आजोबा म्हातारे असल्यामुळे माझे वडील सदर शेती वाहत होते.

**१२.** हे म्हणणे खरे आहे की,माझ्या आजोबाची शेती प्रकल्पामध्ये गेली होती. हे मला माहित नाही की, माझ्या वडीलांना नोकरी ही माझ्या आजोबाची शेती प्रकल्पात गेल्यानंतर मिळाली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.५२ मधील मजकूर मी माझ्या वडीलांच्या सांगण्यानुसार लिहीलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे आजोबा हे म्हातारे असल्याने त्यांच्या म्हातारपणाचा फायदा घेउन चुकीचे बक्षीसपत्र तयार करून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, सदर शेती ही वडीलोपार्जित असल्याने माझ्या आजोबांना बक्षीसपत्र करण्याचा कोणताही अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी माझ्या नावाने माझ्या आजोबाकडून चुकीचे बक्षीसपत्र तयार करून घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांना सदर जमीनीमधुन हिस्सा जाऊ नये म्हणुन माझ्या वडीलांनी माझ्या नावाने माझ्या आजोबांकडून खोटे बक्षीसपत्र तयार करून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी माझ्या आजोबाचे घरी आंगठे घेउन माझ्या वडीलांनी रजिस्ट्रार यांच्याकडून खोटे बक्षीसपत्र तयार करून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, सदर बक्षीसपत्राबाबत माझ्या आजोबांना काही माहित नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सदर खोट्या बक्षीसपत्रावरून माझ्या वडीलांनी माझ्या नावाने खोटा फेरफार करून घेतला. हे म्हणणे खरे नाही की,माझे नि.क्र.५२ मधील शपथपत्रातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे

खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड
दि१७.०२.२०२६

समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड